"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : ०२२ – ४७४९ ८२५९ / ९८६७६ ७४८६४
**WEB SITE : http://www.nkgsbsangh.org**
**E-MAIL : nkgsbs@gmail.com**
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

।। अकरणात् मंदकरणं श्रेयं ।।

मूल्य रु. ५

क्रमांक ४ वर्ष : ४७ जानेवारी–मार्च २०२६

**BOOK PACKET**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

## *नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!*

**हे २०२६ वर्ष तुम्हां सर्व ज्ञाति बांधवांना सुखाचे, समृद्धीचे व भरभराटीचे जावो ही मंगेश-शांताई चरणी नम्र प्रार्थना!**

## संपादकीय

२०२५ ऑक्टोबरच्या १० तारखेस संघाच्या नवीन कार्यकारिणीची पहिली बैठक पार पडली. या मध्ये श्री. शिरीष दिनानाथ वाघ यांची अध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. या आधी हे पद श्री. मारुती विश्वनाथ दळवी यांनी जवळ जवळ १० वर्षे अतिशय योग्य रितीने सांभाळून संघात नियमितपणा आणून संघाच्या देणग्यांमध्ये भरघोस वाढ होईल याची काळजी घेतली. श्री. दळवी यांनी त्यांच्या ७५ ते ८२ वर्षे वयात सुद्धा तरुणांना लाजवेल असे संघासाठी नियमित कार्य केले आहे. ते मुलुंडहून गिरगांवच्या ऑफिसात निदान आठवड्यातून १-२ वेळा तरी वेळ काढून येत असत व त्यांनी सर्व प्रकारच्या कार्यामध्ये नेहमी जातीने लक्ष घातले. हे हाडाचे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या कारकिर्दीत संघ आणखीनच बहरला. त्यांना त्यावेळी शिरीष वाघ यांची उत्तम साथही मिळाली.

संघाला सर्व बाबतीत त्यांनी आपले अपूर्व योगदान दिले आहे. त्यांच्या निवृत्ती नंतरही शेवटच्या टप्प्यात आलेली कामे शिरीष व त्यांचे सहकारी जबाबदारीने तडीस नेतील यात शंकाच नाही. श्री. मारुती दळवी यांनी त्यांच्या प्रकृती स्वास्थ्यासाठी निवृत्ती जरी घेतली असली तरी पुढेही वेळोवेळी त्यांचा सल्ला घेऊनच आम्ही पुढील वाटचाल करू हे निश्चित. त्यांचे आरोग्य स्वस्थ राहो हीच श्री मंगेश चरणी नम्र विनंती.

**संघाची नवी कार्यकारिणी पुढीलप्रमाणे निवडली गेली आहे.**

श्री. शिरीष दिनानाथ वाघ - अध्यक्ष
श्री. राजीव दिनकर गायतोंडे - उपाध्यक्ष
श्री. वामन मंगेश नाडकर्णी - ज्वॉइंट सेक्रेटरी
श्री. नवनीत मोहन कसबेकर -ज्वॉइंट सेक्रेटरी
श्री. अरुण मनोहर वाघ - खजीनदार
श्री. शिवानंद वादुसेव कुलकर्णी - खजीनदार

श्री. प्रसाद मोहन कसबेकर – संपादक, मुखपत्रिका

श्री. उदय महाबळेश्वर नाडकर्णी – सभासद

श्री. दिपक देवीदास कुलकर्णी – सभासद

श्री. रमेश काशीनाथ वागळे – को ऑप्ट सभासद

संघाचे कार्य असेच दिवसेंदिवस वृद्धींगत होत राहो व आपल्या ज्ञातिबांधवांना त्याचा योग्य लाभ मिळत राहो ही श्री चरणी प्रार्थना!

– प्रसाद कसबेकर



# स्नेहपूर्ण श्रद्धांजली

# समर्पित जीवनाचा अंत



**आपले डी.एन्. गेले!**

**आम्ही पोरके झालो!**

गेली ४५ वर्षे ज्यांनी संघाची मुखपत्रिका अविरत चालवली, ४५ वर्षांआधी जिला जन्म दिला, तिला जीवापाड जोपासले, तिला मोठे केले व ३ वर्षांआधी माझ्या हाती जिची दोर दिली त्या मुखपत्रिकेचे निर्माते व सर्वेसर्वा दत्तात्रय नागेश नाडकर्णी गुरुवार, दिनांक १८/१२/२०२५ रोजी रात्री २ वाजता आपणा सर्वांचा निरोप घेऊन इहलोक सोडून श्री मंगेश चरणी विलीन झाले. श्री मंगेश त्यांच्या आत्म्यास सद्‌गति देवो. श्री. डी. एन्. यांचे जीवन हे एक समर्पित जीवन होते. या जीवनाला कधी शारीरिक व मानसिक विश्रांती अशी मिळालीच नाही. ते डोळस, बुद्धिवादी आणि कर्मयोगी आचरणाचे पुरस्कर्ते होते. जीवनाचा उपभोग घेताना वेळात वेळ काढून त्यांनी संघाच्या कार्याला वाहून घेतले होते. इतरांना हरेक प्रकारे सहाय्य देण्यासाठी आपले बुद्धिवैभव व शक्तिवर्चस्व खर्च करून डी. एन्. यांनी निरामय सेवेचा आदर्श उभा केला.

मुखपत्रिकेसाठी त्यांनी अपार कष्ट केले. त्याचप्रमाणे त्याच्या गुणलौकिकात भर पडावी म्हणून नवनव्या कल्पनांचे लेणे त्यावर चढविले. वृत्तसंपादनातील कौशल्याचे एकेक आलेख ते पाहता पाहता सुचवित असत. ते एक ऋषिमनच होते. अनेकाविध क्षितिजे त्या मनापुढे विस्तारली. मनाची संकुचितता, कल्पनेचे दारिद्र्य, आर्थिक कृपणता त्यांना कधी मानवलीच नाही. जे जे त्यांच्यापाशी होते ते ते त्यांनी दोन्ही हातांनी उधळून लोकांना दिले. आपल्या ज्ञातिबांधवांवर अपरंपार माया करीत आणि त्यांना चटका लावण्यासारख्या आठवणींची त्यांच्यापाशी शिदोरी ठेवीत त्यांनी १८/१२/२०२५ या दिवशी आकस्मिकपणे वयाच्या ८९ व्या वर्षी प्रयाण केले.

एका समर्पित जीवनाचा हा अंत होय.

**हा दत्तात्रय, मार्गशिर्षाच्या शेवटच्या गुरुवारी**
**पंचतत्वात विलीन झाला !**

**– प्रसाद कसबेकर**



पंतप्रधान नरेंद्र मोदी पर्तगाळ काणकोण मठाचे स्वामी यांना वंदन करताना




जय श्रीरामाची ७७ फूट उंच ब्राँझची प्रतिमा व त्या सह स्वामी, गोव्याचे मुख्यमंत्री सावंत व पंतप्रधान नरेंद्र मोदी


## The NKGSB Sangh Thane Manch

### Thane Manch has organised ONE DAY PICNIC

**Place :** Patil Farm House, Shirsad, Vajreshwari Road,
Date : Sunday, 18th January 2026
Bus available from **Jogeshwari, Mahim** and **Thane**
**Lunch followed by TILGUL SAMARAMBH**




**Bus booking will start from 5th December2025**


## माहीम येथील हळदीकुंकू (मकर संक्रांतीचा)

गतवर्षी आपल्या 'मिराज टॉवर' येथील संघाच्या जागेत तेथून जवळच रहाणारे राजीव गायतोंडे व शिवानंद कुलकर्णी यानी पुढाकार घेऊन कार्यक्रम पार पाडला होता. परंतु ह्या वेळी त्या दोघानी'आम्हाला जमणार नाही तरी माटुंगा–माहीम येथील महिलांना पुढाकार घ्यायला सांगावे' असे स्पष्ट म्हटल्यामुळे आम्ही ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ च्या मुखपत्रिकेच्या अंकात त्या प्रमाणे माहीम भागातील महिलांना तो कार्यक्रम करण्याचे आव्हान मुखपत्रिकेतून केले, परंतु कुणीही महिलांनी पुढाकार न घेतल्याने संघाचा माहीम येथील हळदीकुंकुवाचा कार्यक्रम रद्द करण्यात येत आहे याची तेथील महिलांनी कृपया नोंद घ्यावी. धन्यवाद.

(राजीव गायतोंडे हे आता कमिटीचे उपाध्यक्ष झाल्यामुळे त्यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या आहेत व त्यामुळे त्यांनी आपली असमर्थता दर्शविली आहे. तसेच शिवानंद कुलकर्णीही या कार्यासाठी उपलब्ध नसल्याने हा कार्यक्रम रद्द होत आहे.)

# ज्ञातिबांधवांचे वार्षिक स्नेहसंमेलन ३० नोव्हेंबर २०२५

सालाबादप्रमाणे यंदाही भरलेले आपल्या ज्ञातिबांधवांचे स्नेहसंमेलन ३० नोव्हेंबर२०२५ रोजी मोठ्या थाटामाटात व उत्साहाने पार पडले. माहीम येथील तेंडुलकर हॉल सभागृहात जवळजवळ २०० च्यावर प्रेक्षकांनी हजेरी लावली. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रिया लाईफ सायन्सचे सर्वकाळ अध्यक्ष श्री. डॉ. सतीश वामन वाघ व त्यांच्या सुविद्य पत्नी श्रमिती स्मिता सतीश वाघ यांना आमंत्रित करण्यात आले होते. डॉ. सतीश वाघ यांचा परिचय गेल्या मुखपत्रिकेत (ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५) विस्ताराने दिलेलाच होता. यंदाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नेहमीप्रमाणे प्रसाद कसबेकर यांनी छान रीतीने हाताळले. सुरुवात श्रीमती प्रज्ञा वागळे यांच्या सुमधुर स्वागतगीताने झाली. नंतर नेहमीच्या प्रथेनुसार व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. तद्नंतर निधन पावलेल्या ज्ञातिबांधवांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्तब्धता पाळून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

यानंतर ज्ञातीतर्फे संघ अध्यक्षांनी प्रमुख पाहुण्यांना पुष्पगुच्छ व संघाचे स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव केला. तसेच प्रमुख पाहुण्यांच्या पत्नी सौ. स्मिता यांना एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांनी पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव केला संघाचे नवे अध्यक्ष शिरीष वाघ व सोसायटीचे अध्यक्ष देवदास नाडकर्णी यांनी आपापल्या संस्थांच्या गेल्या वर्षीच्या ठळक घटनांचा आढावा घेतला. यानंतर संघाचे उपाध्यक्ष राजीव गायतोंडे यांनी उपस्थितांना प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली.

डॉ. वाघ यांनी आपल्या भाषणात, आपल्या ज्ञातीतील नवीन पिढीसाठी तळमळीने पुढाकार घेत धैर्याने उद्योगात सामोरे येण्याचे आव्हान केले. त्यासाठी कुठल्याही प्रकारचे मार्गदर्शन करण्याचीही तयारी दाखवली. त्यांना धडाडीने उद्योगजगतात येण्यासाठी प्रवृत्त केले.

'नोकरी एके नोकरी' करत न बसता इतर जातींच्या मुलांप्रमाणे धडपडण्यासाठी प्रोत्साहन दिले. या व्यक्तव्यामुळे आपल्या नविन पिढीमधे एक जबरदस्त स्पार्क जाणवला. त्यांनी आपल्या स्वत:च्या बाबतीत इथपर्यंतची मजल सच्चेपणाने कशी करू शकलो ह्याचे उत्तम उदाहरण दिले. पुढे जाऊन त्यांनी संघाला दरवर्षी २५ लाखांची देणगी देण्याचे जाहीर केले. संघ व एज्युकेशन सोसायटी त्यांचे नेहमीच ऋणी राहतील. त्यानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती स्मिता यांच्या तर्फे प्रावीण्य मिळालेल्या विद्यार्थी विजेत्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे प्रदान करण्यात आली. तसेच पंचाहत्तरी उलटलेल्यांचा सत्कार व लग्नाला ५० वर्षे उलटलेल्या जोडप्यांचा सत्कार करण्यात आला.

वामन नाडकर्णी यांनी आभारप्रदर्शन केल्यानंतर राष्ट्रगीत म्हटले गेले. ज्ञातिबांधवांना उपहार बॉक्सेस देऊन कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

– प्रसाद कसबेकर

## गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना बक्षीसे व इतर गुणवत्ताधारक बक्षीसे २०२५–२०२६
## मेरीट प्राइझेस एसएससी २०२५–२०२६

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1. | SCO1 | सानवी सज्जन सुखटणकर | SSLC | 97.80% |
| 2. | SCO2 | ओवी पराग तेलंग | ICSE | 97.7% |
| 3. | SCO3 | आदित शैलेंद्र तेलंग | ICSE | 97.4% |
| 4. | SCO4 | स्तुता गुरुदत्त दिवेकर | SSC | 96.0% |
| 5. | SCO5 | सिद्धार्थ प्रशांत पै | SSC | 95.8% |
| 6. | SCO6 | आदिश भूषण तिनेकर | ICSE | 95.2% |
| 7. | SCO7 | आयान गिरीष तेलंग | SSC | 93.2% |
| 8. | SCO8 | निलया निलेश साखरदांडे | SSC | 92.8% |
| 9. | SCO9 | पवित्रा शंकर पालेकर | SSC | 89.8% |
| 10. | SC10 | तनिष्का निरंजन कुलकर्णी | ICSE | 85.0% |
| 11. | SC11 | आशुतोष गुरुदास गायतोंडे | SSC | 80.2% |

## HSC SCIENCE

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | HS01 | सारा संतोष देशपांडे | 95.6% |
| 2. | HS02 | आर्या रवींद्र वर्टी | 90.8% |
| 3. | HS03 | सौम्या मंदार बोरकर | 87.0% |

## HSC COMMERCE

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | HS01 | सलोनी गौरीश सलगर | 94.6% |
| 2. | HS02 | प्राप्ती यशवंत गायतोंडे | 81.7% |

## GRADUATES

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | GR-01 | श्रेया नितीन कामत | B.COM |
| 2. | GR-02 | नियती सुधीर कामत | B.COM |
| 3. | GR-03 | प्रथम प्रफुल करूर | B.COM |
| 4. | GR-04 | निशीता नीलेश साखरदांडे | B.A. |
| 5. | GR-05 | ईशान शंकर बोरकर | B.E.(Electrical & Electronics) |
| 6. | GR-06 | स्वरा गौरिश सलगर | B.Physiotheropy |

## DIPLOMA

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | DI-01 | अथर्व संजीव कसबेकर | DIPLOMA IN MECHANICAL. |

## POST GRADUATES

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | PG-01 | चैतन्य प्रशांत पै | B.Pharm. |
| 2. | PG-02 | आर्या मोहन सबनीस | C.A. |
| 3. | PG-03 | सिद्धांत अजोय दिवेकर | Master of Computer |
| 4. | PG-04 | डॉ. नील अनंत तिनेकर | M.S. (General Surgery) |
| 5. | PG-05 | नवीन नरेंद्र नायक | M.Sc. (Organic Chem.) |
| 6. | PG-06 | शितल अरुण मणेरकर | M.D (Internal Medicine) |

## MUSIC & SPORTS

| | | | |
|---|---|---|---|
| **1.** | **OTH-01** | शमिका यतीन जोशी | Selected to represent India at the 3rd world Junior Rhythmic Gym. Champ. |
| **2.** | **OTH-02** | हर्ष गौतम वागळे | SILVER MEDALS IN SHIVAMOGGA OPEN 6th International Karate Championship |

**3.** **OTH-03** काव्या प्रशांत चौधरी Gold Medal in Uneven Bars, individual Events at the Gym National Championship organised by Gym Federation Of India, Bronze medal for standing 3rd in All India Sub-junior all round rating in Artistic Gymnastics.

### ७५ वर्षे वयोमर्यादा ओलांडणाऱ्यांना स्मृतिचिन्हे देण्यात आली त्यांची नावे (२०२५-२०२६)

१. डॉ. प्रवीण वेंकटराव देसाई - कारवार
२. श्री. अनंत मधुकर वागळे - अंधेरी
३. श्री. दीपक रघुवीर वागळे - वरळी
४. श्रीमती संध्या विलास सोहोनी - गोरेगाव
५. श्रीमती नीता दुर्गादत्त तेलंग - माहीम
६. श्रीमती शैला देवदास नाडकर्णी - माहीम
७. श्रीमती अपर्णा आशुतोष बोरकर - फोर्ट
८. श्रीमती शीतल (वृंदा) जयप्रकाश देसाई - अंधेरी
९. श्रीमती सीता शांताराम पिकळे -जोगेश्वरी
१०. श्री. गोविंद गुंडोपंत मुंडवाडकर - डोंबिवली
११. श्री. उदय मनोहर वाघ - मुलुंड
१२. श्री. दुर्गानंद अनंत कसबेकर - मालाड
१३.श्रीमती मीरा निशीथ प्रभू वेर्लेकर-म्हापसे,गोवा
१४. श्रीमती शुभदा उदयशंकर वाघ - माहीम
१५. श्री. राजीव दिनकर गायतोंडे - माहीम
१६. श्रीमती संगीता शिरीष वाघ - दहिसर
१७. श्री. विजय पांडुरंग वाघ - बोरीवली
१८. श्रीमती अर्चना रवींद्र देसाई-माहिम

### विवाहाचा सुवर्ण महोत्सव गाठणारी जोडपी - २०२५-२०२६

१. श्रीमती राधा व श्री. यशवंत शिवराय आरस - ग्रांटरोड
२. श्रीमती सुलक्षणा व श्री. विजयकुमार नरहर तेलंग - माटुंगा
३. श्रीमती शीतल (वृंदा) व श्री. जयप्रकाश नीळकंठ देसाई - अंधेरी
४. श्रीमती शीला व श्री विठ्ठल महाबळेश्वर वाघ - पुणे
५. श्रीमती ज्योती (राधा) व श्री. दीपक रघुवीर वागळे - वरळी
६. श्रीमती विद्या व डॉ. दिलीप जयवंत केळेकर - माहीम
७. श्रीमती सुनिती व श्री. विठ्ठल जयवंत कुलकर्णी - पुणे
८. श्रीमती शुभदा व श्री सुभाष भालचंद्र कुलकर्णी - ठाणे
९. श्रीमती ज्योती व श्री किरण सुखटणकर - ठाणे
१०. श्रीमती शुभदा व श्री उदयशंकर आनंद वाघ - माहीम

www.kccgoa.in

# कोमल हिरवी तृणपाती ही
# अलगद झुलवी सर्वांग,
# कोवळ्या सुवर्ण प्रकाशात
# उजळून जाई आनंद



अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून 2 मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

**फ्लॅटस् उपलब्धः 1 रुम किचन, 1 बी.एच्.के, 2 बी.एच्.के**

प्रॉजेक्ट मान्यताः गोवा टाउन प्लॅनिंग
कर्जसहाय्यः नामवंत वित्त संस्था

a Project by:
KCC **कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी**

**मुंबई ऑफिसः** श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टेलिः **2683 3841/47/72.** मोबाः **98336 36451**
फॅक्सः 2683 3872 ई-मेलः kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिसः टी- 1, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबाः 98209 33352, 98206 33321 | गोवा साईटः 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

## प्रकाश झोत–१

**श्री मनोज फेणे यांच्या नेतृत्वाखाली जे. ई.एस.ला स्वच्छता मोहिमेत प्रथम पारितोषिक.**

वांद्रे येगील कार्टर रोड जवळील 'वेळे'वर' स्वच्छता मोहीम आयोजित करण्यात आली होती. मुंबई विद्यापीठ व स्वच्छ वसुंधरा या सेवाभावी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या स्तुत्य उपक्रमात मुंबईतील तीस महाविद्यालयांनी सहभाग घेतला त्यांच्या पैकी उत्कृष्ट कार्य आणि समर्पणाबद्दल अरविंद गंडभीर शाळा चालविणाऱ्या जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटी कॉलेजला (जे.ई.एस.) प्रथम पारितोषिक मिळाले. या स्वच्छता मोहिमेत तीस कॉलेजच्या हजारभर स्वयंसेवकांनी किनाऱ्यावर पडलेल्या प्लास्टीकच्या बाटल्या, पिशव्या, निर्माल्य व इतर कचरा गोळा करुन संपूर्ण परिसर स्वच्छ केला. या उपक्रमात जेईएसचे ५० स्वयंसेवक सहभागी झाले होते. जेईएस कॉलेजचे विद्यार्थी कार्याध्यक्ष श्री. मनोज फेणे यांच्या नेतृत्वाखाली दरवर्षी स्वच्छता मोहीम साकारतात.

रक्तदान शिबीर, मागासलेल्या भागातील शाळांचे दत्तक घेणे, पथनाट्य, वापरात नसलेले चांगले कपडे व साड्या एकत्रीत करून त्याचे वाटप करणे, इत्यादी सामाजिक कार्यक्रमांचेही जेईएस् तर्फे आयोजन करण्यात येते.

अरविंद गंडभीर हायस्कूलचे विशेष कौतुक म्हणजे या शाळेतील विद्यार्थी चाळींतून व झोपडपट्टीतून चांगले शिक्षण मिळते म्हणून येतात. गेली कित्येक वर्षे दहावीचा निकाल १००% लागतो. त्यासाठी शिक्षकवर्ग व व्यवस्थापन मंडळींचे अभिनंदन करायला पाहिजे.

## प्रकाश झोत–२



## प्रकाश झोत–३

**सुनील सागवेकर यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव**

जोगेश्वरीतील अरविंद गंडभीर हायस्कूलचे शिक्षक सुनील सागवेकर यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सेकंडरी स्कूल एम्प्लॉईज को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीतर्फे 'पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार २०२५'देऊन गौरवण्यात आले. संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त आयोजित स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिक वितरण सोहळा मुलुंडच्या कालिदास नाट्यगृहात नुकताच पार पडला. त्या कार्यक्रमात आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार संजय जगताप, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व नाबार्ड बँकेचे सतीश मराठे माननीय निर्देशक यांच्या हस्ते सुनील सागवेकर यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील व संचालक मंडळ यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

## प्रकाश झोत–४

**डॉ. सतीश वामन वाघ**

१६८८ जणांच्या सर्वात श्रीमंत भारतीयांच्या यादीमध्ये डॉ. सतीश वाघ यांचा ६४७ वा नंबर लागतो. ह्या वर्षी त्यांची उलाढाल ४३५० कोटी इतकी गणली गेली आहे. त्यांचे अभिनंदन करताच ते म्हणाले की 'पुढील वर्षी ही संख्या दुप्पट होईल.

त्यांना असेच घवघवीत यश लाभो व आपल्या ज्ञातितील एक सुप्रसिद्ध उद्योगपती म्हणून त्यांची भरभराट होत राहो हीच श्री. मंगेशा चरणी प्रार्थना!


A name that spells its class !

**WINOVER CATERERS**

**Marriages, Thread Ceremonies, Engagement and Birthday Parties Etc.**

**WE DELIVER FOOD / SNACKS FOR PARTIES AT HOME**

**Take away and TIFFINS Or opt for Ala-carte**

**Amchi food and Variety cuisines**

ALL OVER MUMBAI-THANE-VIRAR

**Call or Whatsapp for our take away menu**

**Vinod Kaval / Ashwini / Rupali**

**98208 43392 / 90048 41198 / 98923 00608**

Shop No. 4, Andrea Apartment off Azad Road, Vile Parle East, Mumbai - 400 057

## स्व. सुरेशचंद्र बोरकर – माझ्या गुरूंना एक आदरांजली
## दिव्यत्वाची जेथ प्रचीती, तेथे कर माझे जुळती

माननीय सुरेशचंद्र बोरकर यांचे दोन महिन्यापूर्वी निर्वाण झाले आणि आपण आपल्या ज्ञातीचा एक आधारवडच जणू गमावला. बोरकरसरांशी माझा वैयक्तिक संबंध पाच दशकाहून अधिक काळाचा होता. मी माझ्या बालपणी जिथे राहत असे त्या मॉडेलहाऊस मध्ये ते त्यांच्या काही जवळच्या नातेवाईकांना भेटायला येत त्यावेळी ते अत्यंत रुबाबदार कपडे घालून असायचे व मला इंग्रजांसारखेच भासायचे. त्या काळात नोकरीच्या ठिकाणी चालकासह वाहन सुविधा मिळणे हे फारच दुर्मिळ होते. ज्या प्रतिष्ठित ए.एफ. फर्ग्युसन आणि कंपनीमधून त्यांनी सीए पूर्ण केले होते तिथेच माझ्या कुटुंबातील काही सदस्यांनी नोकरी केली होती व संझगिरी कुटुंबीयांचे ते जवळचे नातेवाईक असल्यामुळे मी त्यांना सत्तरच्या दशकाच्या सुरुवातीला कधी कधी कौटुंबिक समारंभांमध्येही भेटण्याचा योग येत असे.

बोरकर सर माझे आदर्श असल्यामुळे त्यांचा प्रगतीचा मागोवा मी सदैव घेत असे. म्हणून जेव्हा मी सीएची परीक्षा उत्तीर्ण झालो तेव्हा पुढील वाटचालीच्या मार्गदर्शनासाठी त्यांच्याकडे गेलो असताना त्यांनी मला फार आनंदाने भरघोस मदत केली. नोकरीसाठी लागणारा सी.व्ही. पण त्यांनी पूर्णपणे नव्याने करून दिला फक्त माझे नाव त्यांच्या संपादनातून सुटले एवढेच. एका खूप मोठ्या बहुराष्ट्रीय कंपनीचे फायनान्स डायरेक्टर असूनही ते व्यावसायिक जगात प्रवेश करू पाहणाऱ्या माझ्यासारख्या नवोदितांना सदैव खूप मदत करीत असत. नवीन उमद्या तरुणांना कसे प्रोत्साहित करावे हे त्यांच्याकडून शिकण्यासारखे होते व या बाबतीतला माझा पहिलाच अनुभव होता. त्या क्षणापासून ते कायमच माझे मार्गदर्शक बनले.

९० च्या शतकाच्या सुरुवातीला त्यांनी कॅडबरी कंपनीच्या फायनान्शिअल आणि कमर्शियल डायरेक्टर या पदावरून निवृत्ती घेतली आणि ते एन.के.जी.एस.बी. बँकेचे मानद अध्यक्ष बनले. एका बहुराष्ट्रीय कंपनीच्या कार्य पद्धतीतल्या वातावरणातून एका सहकारी संस्थेच्या वेगळ्या स्वरुपातल्या वातावरणात कार्यरत होण्याचे कौशल्य त्यांनी लगेचच आत्मसात केले. याबद्दल मला खूपच आश्चर्य वाटले. तसेच बँकेच्या संचालकपदी असताना त्यांनी कार्य प्रणालीत केलेल्या अनेक बदलाने आम्ही सर्व आश्चर्यचकित झालो. ज्या समाजात आपली चढण घडण होते व यशाच्या पायऱ्या चढत आपण कर्तृत्ववान होतो त्या समाजाच्या ऋणातून मुक्त होण्याचे महत्त्व व आपल्या समाजाच्या मूळ स्वरूपी अनुबंधाला न विसरण्याचे महत्त्व त्यांनी मला शिकवलं व त्यांच्या विनंतीवरुनच मी एन.के.जी.एस.बी. बँकेच्या संचालक मंडळात सामील झालो. एन.के.जी.एस.बी. बँकेत त्यांच्याबरोबर काम करत असताना कधीही त्यांना त्यांच्या बहुराष्ट्रीय कंपनीच्या पार्श्वभूमीचा संदर्भ देताना मी पाहिलं नाही. अध्यक्ष म्हणून त्यांनी अनेक उपक्रम आणि अनेक नवीन मतप्रवाह प्रोत्साहित केले आणि फार विचारपूर्वक त्याची अंमलबजावणीही केली. बँकेच्या कर्मचाऱ्यांना त्यांची विविध बाबतीतील मते आणि त्यांचे दृष्टिकोन व्यक्त करण्यासाठी त्यांनी खूप प्रोत्साहन व अवसरही दिले.

नागरी सहकारी बैंकिंग क्षेत्रामध्ये सहकारी क्षेत्राशी अपरिचित असूनही व्यावसायिक व्यवस्थापनासाठी कुशल संचालकाची गरज असते. त्यांचे बैंकिंग ज्ञान मर्यादित असू शकते परंतु एखाद्या समाजाच्या बँकेसारख्या संस्थेमध्ये अपेक्षा पूर्ण करणाऱ्या विश्वस्तासारखी त्याची भूमिका असते. सततच्या बदलत्या व्यावसायिकतेच्या परिमाणांचा त्यांचा अनुभव अशा बँकांना एक निश्चित व्यावसायिक दिशादर्शक ठरू शकतो. तशातच ९० च्या दशकाच्या सुरुवातीला अनेक महत्वपूर्ण आर्थिक सुधारणांची अंमलबजावणी आपल्या देशात होत होती व त्या दृष्टीने आपल्याला सुरेशसरांसारखे सुयोग्य नेतृत्व मिळणं फार कठीण होतं. त्या काळात बँकेच्या भवितव्यासाठी त्यांनी एक व्यावसायिक दृष्टिकोन आणि दिशादर्शन केले ज्यामुळे आपल्या बँकेला सहकार क्षेत्रामध्ये एक महत्वाचे स्थान प्राप्त झाले.

त्यांच्या प्रभावी व उद्दिष्टपूर्ण व्यवस्थापन शैलीमुळे तसेच अशा बदलांसाठी आवश्यक असे कर्मचारी व अधिकारी तयार करण्याचे पूर्ण श्रेय बोरकर सरांना जाते. बँकेबरोबरच ते एनकेजीएसबी संघ आणि एनकेजीएसबी शिक्षण संस्थेचे सुद्धा सक्रिय कार्यकर्ते होते. बँकेच्या संचालक मंडळावरून निवृत झाल्यानंतरही ते एक महत्वाचे सल्लागार या भूमिकेत होते. बँकेच्या संस्थापकांच्या नावाने स्मारक व्याख्यानमाला सुरु करत असतानाच बँकेच्या सर्व स्तरावरील कर्मचाऱ्यांसाठी व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था तसेच गुणवंत कर्मचाऱ्यांसाठी पारितोषिके आणि सर्व स्तरावरील कर्मचाऱ्यांसाठी व त्यांच्या विकासासाठी अनेक पदोन्नती योजना त्यांनी सुरु केल्या. बँकेच्या सर्व व्यवहारातील प्रामाणिकपणा व पारदर्शकतेसाठी अनेक नवीन पद्धतीचा अवलंब सुरू केला. त्यांच्या काळात बँकेच्या शाखांची संख्या व नफाक्षमताही मोठ्या प्रमाणात वाढली. उत्कृष्ट व्यवस्थापनासाठी विविध उपक्रमाद्वारे त्यांनी पुढील संचालक मंडळांसाठी असा एक आदर्शवत व अविस्मरणीय असा वारसा निर्माण केला. मनाने ते नेहमीच आपल्या समाजाच्या कल्याणासाठी कार्यरत असत व बँकेच्या सर्वसामान्य ठेवीदारांनी कष्टाने मिळवलेल्या बचतीसाठी आपल्या बँकेवर जो विश्वास ठेवला तो कधीही व्यर्थ ठरू नये यासाठी त्यांचा आग्रह असे.

वयोमानानुसार व वृद्धत्वामुळे जरी ते आपल्यातून निघून गेले असले तरी माझ्यासारख्या त्यांच्या अनेक अनुयायांना हा एक आकस्मिक धक्काच आहे. माझी मनःपूर्वक अशी इच्छा आहे की त्यांनी पुनर्जन्म घ्यावा आणि आपल्या समाजासाठी पुन्हा कार्य करावं. सतत बदलत जाणाऱ्या जागतिक परिस्थितीमध्ये आपण बऱ्याचदा तत्वनिष्ठ व एकनिष्ठ राहू शकत नाही म्हणूनच सुरेश बोरकरसरांसारखी व्यक्ती आपल्या समाजामध्ये जन्मली हे आपल्या समाजासाठी एक मोठं भाग्यच होतं. त्यांचा एखाद्या गोष्टीकडे बघण्याचा प्रामाणिक दृष्टिकोन आणि कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीला न डगमगता समाजाची सेवा करणे हे आपण कायम लक्षात ठेवलं पाहिजे.

अशा या उत्कृष्ट व्यवस्थापनतज्ञाला व सदैव समाजाभिमुख असणाऱ्या एका समर्पित महान व्यक्तिमत्वाला माझी मनःपूर्वक आदरांजली.

**–महेश आरस**



# देखणं कारवार

नीलिमा नाडकर्णी, माहीम



आठवणीतलं गांव म्हटलं की उंच उंच पर्वतरांगा, निळा स्वगर नि चहू दिशांना हिरवाईचं लेणं घेऊन नटलेलं 'कारवार' डोळ्यांसमोर उभं राहतं. त्याचं सौंदर्य इतकं लोभसवाणं की, पहाटे घराबाहेर पाहताच 'पाचूच्या हिरव्या माहेरी, ऊन हळदीचे आले' असा भास होई. काजूबाग, कोडीबाग, बाड, सदाशिवगड वगैरे अंतर्भाग नि अंकोला, अवर्सा वगैरे गावांनी कारवारभोवती जणू फेर धरला आहे. प्रत्येकाचं निसर्गसौंदर्य वेगळं, पण देखणं! कारवारचा सागरकिनारा प्रेक्षणीय आहे. दिवेलागणीच्या वेळेपर्यंत शुभ्र, रुपेरी वाळूत बसून लांबवरच्या देवगडच्या दीपस्तंभाचा प्रकाश न्याहाळताना उठूच नये असं वाटतं. कारवारला काळी नदी समुद्राला जाऊन मिळते. पूर्वी या नदीच्या किनाऱ्यावरील कद्रे, किन्नर वगैरे गावांपर्यंत जाण्यासाठी शिडाच्या होड्या असत, त्यातून सफर होई.

सुरी पार्क हे एक लोकप्रिय ठिकाण होतं. गावातल्या रस्त्याच्या दोहो बाजूंची हिरवीगार झाडं लोकांचं स्वागत करीत. याखेरीज प्रत्येक घराच्या परसात नारळ, आंबा, फणस, नीरफणस, शेवगा, आंबाडे यांची झाडं नि मायाळूसारख्या भाज्या, महाळुंग अशी हिरवी संपदा नि अंगणात जाई, जुई, मोगरा, अबोली, प्राजक्तासारखी पुष्पसंपदा असायचीच. मुरलीधर मठ, बाड येथील मठ ही धार्मिक सोहळ्याची ठिकाणं होती, तर साते बाजार हा खरेदीचा आनंद देणारा आठवड्याचा बाजार! २ जानेवारी, १८९७ रोजी वामन मंगेश दुभाषी-ऋग्वेदी (पुलंचे आजोबा) आणि हरिभाऊ कामत यांनी सुप्रसिद्ध हिंदू हायस्कूलची स्थापना करून शिक्षणाची उत्तम सोय केली. आठवणीतलं गाव वाचनालयामुळे उच्च अभिरुची आणि मित्र समाजामुळे आपुलकीचे भावबंध निर्माण करीत संस्कृतीची जपणूक करणारं माझं गाव! त्यामुळेच एखाद्याकडील विवाह समारंभ परिचिताच्या किंवा नातलगाच्या अंगणात मांडव घालूनही साजरा होई. फुलवेड्या स्त्रिया अंगणातील मोगरा, अबोलीसारख्या फुलांबरोबर विशिष्ट हिरव्या पानांच्याही वेण्या घालून मिरवत असत.

अभिमानास्पद गोष्ट म्हणजे कविश्रेष्ठ रवींद्रनाथ टागोर यांना येथील सागरकिनाऱ्यावर 'प्रकृति प्रतिशोध' हे नाट्यकाव्य स्फुरलं, म्हणून त्या किनाऱ्याला रवींद्रनाथ टागोर हे नाव पडलं. १९५१ मध्ये साहित्य संमेलनासाठी आलेल्या आचार्य अत्रे यांनी कारवारला दक्षिणेतील काश्मीर अशी उपाधी दिली होती. सदाशिवगड हे ज्यांचं आजोळ ते पुलं म्हणत, 'मी खूप समुद्रकिनारे पाहिले, पण कारवारचा किनारा म्हटलं की, मन कसं उचंबळून येतं, ते सांगता येत नाही.' ख्यातनाम लेखक अ. वा. वर्टी, समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी, स्वातंत्र्यप्राप्तीच्या लढ्याला जीवनसर्वस्व वाहिलेल्या गांधीजींच्या शिष्या प्रेमा कंटक या साऱ्यांचंच कारवारच्या मातीशी नाते! मोठ्या अभिमानानं म्हणावं असं माझं गाव कारवार!

# Mangsidesh Investments Pvt. Ltd

Amfi - Registered Mutuual Fund Distributor

1,2,3 Crystal Tower, Gundavali Road no. 3, Off Andheri-Kurla Road, Andheri East, Mumbai 400069 Phone No. +022 69739900 to 9999

## Education is every child's right, and every parent's responsibility.

| Monthly SIP | Expected Corpus in 15 Yrs | Expected Corpus in 20 Yrs |
|---|---|---|
| 5,000 | ₹ 25.22 Lakhs | ₹ 49.95 Lakhs |
| 10,000 | ₹ 50.45 Lakhs | ₹ 99.91 Lakhs |
| 15,000 | ₹ 75.68 Crore | ₹1.49 Crore |
| 20,000 | ₹1 Crore | ₹ 1.99 Crore |
| 25,000 | ₹1.26 Crore | ₹ 2.49 Crore |

Assuming Rate of Return : 12% p.a




Mutual Fund Investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.

## ज्ञातिबांधवांचे वार्षिक स्नेहसंमेलन ३० नोव्हेंबर २०२५



संमेलनाचे प्रमुख पाहुणे
डॉ. सतीश वाघ भाषण करताना

संघ अध्यक्ष शिरीष वाघ यांच्या तर्फे
डॉ. सतीश वाघ यांचा सत्कार





एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष
देवदास नाडकर्णी तर्फे
श्रीमती स्मिता वाघ यांचा सत्कार

खचाखच प्रेक्षकांनी भरलेला
तेंडुलकर हॉल



## ज्ञातिबांधवांचे वार्षिक स्नेहसंमेलन ३० नोव्हेंबर २०२५



संघ अध्यक्ष शिरीष वाघ
भाषण करताना



एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष
देवदास नाडकर्णी भाषण करताना



श्री. अरुण कसेबकर यांचा
सत्कार करताना प्रमुख पाहुणे
डॉ. सतिश वाघ



श्रीमती ॲना नीरज कसबेकर यांचा
सत्कार करताना एज्युकेशन सोसायटीचे
अध्यक्ष देवदास नाडकर्णी

## ज्ञातिबांधवांचे वार्षिक स्नेहसंमेलन ३० नोव्हेंबर २०२५



छोट्या काव्या चौधरीला
ॲवॉर्ड देताना प्रमुख पाहुणे
डॉ. सतीश वाघ

विवाहाला ५० वर्षे पूर्ण झालेल्या
दांपत्यांचा  सत्कार करताना
प्रमुख पाहुणे डॉ. सतीश वाघ



## मावळते अध्यक्ष श्री. मारुती दळवी यांचा सेंड ऑफ



मागे उभे अरुण वाघ, उदय नाडकर्णी, राजीव गायतोंडे, दिपक कुलकर्णी,
प्रसाद कसबेकर, वामन नाडकर्णी, शिवानंद कुलकर्णी,
पुढे बसलेले मारुती दळवी, शिरिष वाघ

# ठाणे मंच दापोली सहल












## Banganga Maha Arti



बाणगंगा – मुंबई दरवर्षी प्रमाणे कार्तिकी पौर्णिमा (देव –दिवळी)
गंगा आरती संपन्न झाली.



डॉ. सतीश वाघ यांचा नॅशनल पार्कमध्ये गणेश नाईक (वनमंत्री) तर्फे सत्कार करतांना

**MAHARAKTADAAN SHIBIR 2025**
**on 9 - 11- 2025 at Shramik Gym Ground, Lower Parel**



## DR. Satish Wagh Sponsored "Pune Marathon"

Dr. Satish Wagh (Chairman -Supriya life Science Ltd. and Dr. Satish Wagh Foundation)

Dr. Satish Wagh said : "we had sponsored Pune Marathon which was held on 9th November 2025. Unfortunately, because of pre-schedule timely done program of Blood donation which was very very important for me. I could not attend the said event but supported that event. I was extremely shocked when I saw a couple of friends from Mumbai went and participated in the Pune marathon. They did Send me some photographs ."

## MAHARAKTADAAN SHIBIR 2025

On 9/11 / 2025, Dr. Satish wagh attended the **Maharaktadaan Shibir 2025** as the chief guest at M. M. Joshi marg, Shramik Gymkhana Ground, Lower Parel (East), Mumbai. The camp was beautifully organized by Meenatai and Shivshahi Pratisthan, Mumbai along with Vrihan Mumbai Vrutpatra vikreta sangh, and generously supported by Supriya life Science Ltd. and Dr. Satish Wagh foundation. Leading blood banks activity participated, including: hospitals like KEM, Nair, Sion, J.J., HDFC bank blood Centre, Tata, Cooper, Rajawadi, Wadia, Kasturba, St. George hospitals and Meenatai Thakre Blood Bank.

We are posed proud to share that over 2500 targeted donors donated blood on 9/11/ 25. A noble initiative for humanity and social service! *(Picture on Page No.20)*

## **दापोली सफर सप्टेंबर २०२५** (छायाचित्रे पान क्र. १८ वर)

ठाणे मंचाने दापोली सफर पितांबरी ॲग्रो टुरीझम तर्फे आयोजित केल्याचे कळल्यावर प्रवास प्रेमींनी लगेचच प्रतिसाद दिला. ठरल्याप्रमाणे दापोली सफर १५ सप्टेंबरला सुरु झाली. सकाळी ठीक ६.३० वाजता पितांबरी टुरीझमची बस ठाण्याहून निघाली व नियोजित थांब्यांवरून प्रवाशांना घेऊन अटल सेतूवरून पुढे निघाली. जांभूळ पाडा येथे 'फॉरेस्ट इन' मध्ये चविष्ट व भरपेट नाश्ता केला व पुढे निघालो.

रस्त्याच्या दुतर्फा हिरवी वनश्री व आल्हाददायक वातावरणामुळे प्रवास छान झाला. पितांबरी ॲग्रोच्या प्रशस्त व सुंदर रिसॉर्ट मध्ये उतरल्याबरोबर आमचे कोकम सरबत देऊन स्वागत झाले. लगेचच रुचियाना रेस्टॉरंटमध्ये जेवण घेतले. नंतर आंजर्ल्याचा कड्यावरचा गणपती पहावयास गेलो. गणपतीच्या सुंदर मूर्तीचे दर्शन, आरती व प्रसाद मिळाल्यामुळे मंडळी खूष झाली. रात्रीच्या जेवणानंतर हसत खेळत हौझी खेळलो. बऱ्याच जणांना बक्षीसं मिळाली. जुन्या नवीन लोकांची भेट झाली. अशा रीतीने पहिला दिवस आनंदात गेला. खोल्या प्रशस्त, स्वच्छ व सर्व सुखसोयींनी युक्त होत्या.

१६ सप्टेंबरला नाश्ता झाल्यावर श्रीचंडोकी देवीच्या दर्शनाला गेलो. खूप सुंदर मूर्ती होती. नंतर काजूची फॅक्टरी पहावयास गेलो. तेथे काजुच्या प्रक्रिये बद्दल सखोल माहिती मिळाली.

१७ सप्टेंबर सकाळी ७.३० वाजता बांबू पार्क व फळा फुलांची नर्सरी पहावयास गेलो. ३२ प्रकारची बांबूची लागवड केली आहे त्या बद्दल श्री. कौस्तुभ यांनी सखोल व उपयुक्त माहिती दिली. नर्सरी मध्ये चिकू, आंबा, काजू, चाफा इत्यादी बरीच झाडे होती. तेथे मचाणही होते त्यावर उभे राहून फोटो काढले.

रुचियाना रेस्टॉरंटमध्ये बरेच प्रोडक्टस विकावयास ठेवले होते. त्याचा अनेकांनी लाभ घेतला. नंतर आयुर्तेज उद्यानात विविध दुर्मिळ औषधी वनस्पती बद्दल रोचक माहिती मिळाली. नंतर लोटस पार्क पाहिले. सिंड्रेला कारने व खिल्लारी बैलजोडीच्या बैलगाडीतून परीसरात फेरफटका मारला. खूप छान अनुभव आला. नंतर अगरबत्तीच्या कारखान्याला भेट दिली.

ह्या तीन दिवसात उत्तम प्रतिचा नाश्ता मत्स्य प्रेमीसाठी विविध माशाचे प्रकार व शाकाहारी चविष्ट जेवण जेवून सर्वजण तृप्त झाले. तसेच उकडीचे मोदक, पुरणपोळी, खरवस, श्रीखंड यांचाही आस्वाद घेतला.

दुपारी जेवण झाल्यावर ठरल्याप्रमाणे सफरीच्या गोड आठवणी मनात साठवून सर्वजण परतीच्या प्रवासाला निघाले. बस मध्ये अर्चना वागळे ह्यांनी पुढाकार घेऊन अंताक्षरी खेळून धमाल उडवली. सर्वजण तृप्त होऊन आनंदाने घरी गेले आणि त्याचे सर्व श्रेय श्री. सुरेश पालेकर यांनाच जाते. त्यांनी घेतलेल्या पुढाकाराने ही सफर उत्तम झाली.

– सौ. अंजली बोरकर – ९८६९३ ७१८८७

= = = = = = = = = =

## गाण्यांचा प्रोग्राम ठाणे मंच तर्फे (१२ एप्रिल २०२६ रोजी)

ठाणे मंच सादर करीत आहे एक 'सदाबहार' मराठी कविवर्य बा. भ. बोरकर, कवयित्री शांता शेळके आणि कवी मंगेश पाडगावकर यांच्या गाजलेल्या गाण्यांची मैफल आपले कलाकार सादर करतील.

तारीख : रविवार, १२ एप्रिल २०२६

स्थळ : तेंडुलकर हॉल, माहीम. वेळ : सकाळी १०.३० पासून सुरू

सहभाग : प्रभात आणि प्रिया कुलकर्णी, प्रदीप दाभोळकर, तेजश्री कुलकर्णी, जयश्री तेलंग, अंजली बोरकर, प्रिया थळी, ज्योती सुखटणकर

निवेदक : गोमंतकातील प्रसिद्ध लेखिका – मीरा प्रभू वेर्लेकर (तेलंग)

नाश्ता व स्नेह भोजनाची व्यवस्था केली आहे.

बस निर्गमन वेळ : जोगेश्वरी ९.३० वाजता
ठाणे–मुलुंड ९.१५ वाजता

संपर्क : सुरेश पालेकर – ८९२८८५०१९३
राजेश दिवेकर – ९६१९३६२४६०
शिरीष रेगे – ९९२२९६८७२५




रामेश्वर मंदिर संस्थान, जोगेश्वरी शतकमहोत्सव : महिला व बाल कलाकारांसमवेत

## ‘सर्वप्रथम सेवा’ याची व्याप्ती

मुंबईमध्ये हजारो हौसिंग सोसायट्या, टॉवर्स, इंडस्ट्रीयल इस्टेटस् वगैरे आहेत. त्यांचे व्यवस्थापन म्हणजे एक डोकेदुखी व मनस्ताप असतो. भाडी गोळा करणे, बँकेत भरणा करणे, पाणी/वीज/प्रॉपर्टी टॅक्स यांची बिले भरणे, माळी, सुरक्षा, लिफ्टमन यांच्यावर देखरेख ठेवणे, दुरुस्ती देखभाल करणे, हिशेब ठेवणे अशी अनेक कामे असतात. कार्यकारिणीचे सभासद म्हणून कुणाला राहायचे नसते, जे मारून मुटकून सभासद होतात त्यांना वेळ नसतो. आम्ही ही सगळी ए टू झेड कामे करण्याची जबाबदारी घेतो. आमच्याजवळ सध्या अनेक संस्थांची कामे आहेत. त्यांत टाटा हाऊसिंग, लक्ष्मी इंडस्ट्रीयलसारख्या मातब्बर संस्था आहेत. त्याशिवाय लघु उद्योग सुरू करण्यासाठी आमच्याजवळ नोंदविलेले अनेक ट्रेड मार्क्स आहेत.

**उद्दिष्ट :** सेवा पुरविण्यासाठी आम्हाला मनुष्यबळाची आवाश्यकता आहे. इच्छुक ज्ञाति बांधवानी आमच्याशी संपर्क साधावा. त्यांना अर्थार्जन करण्यासाठी आम्ही साहाय्य करू तसेच आमच्या ट्रेड मार्क्सच्याद्वारे व्यवसाय सुरू करण्यासाठी आम्ही मार्गदर्शन करू. ज्ञातिबांधवांची सेवा हेही आमचे उद्दिष्ट आहे.

**संपर्क : न. अ. जोशी : ९८१९३०४५९९/९९२०४०४५९९**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** पोस्ट बॉक्स ११९९०, आझादनगर पोस्ट ऑफिस, अंधेरी (प.), मुंबई ४०० ०५३.

SERVICE FIRST®

98193 04599

99204 04599

सर्वप्रथम सेवा®

SOCIETY SERVICE RESOURCE

**संजय गांधी नॅशनल पार्कला मूक प्राण्यांच्या संरक्षणासाठी डॉ. सतीश वामन वाघ यांजकडून भरघोस देणगी**

माननीय वनमंत्री श्री. गणेश नाईक व चिटणीस श्री. मणी यांच्या उपस्थितीत वरील देणगी देण्यात आली. त्या समयी डॉ. वाघ यांचा सत्कार केला गेला. त्याचे छायाचित्र पान २० वर दिले आहे. टायगर सफारी, पशु हॉस्पिटल, वन्यप्राणी ऑफीसर्सना निगराणीसाठी जीप, इलेक्ट्रॉनिक मीडिया स्क्रीन्स, पशुंच्या आहाराची बिले- डॉ. सतीश वाघ फाऊंडेशन अंश सुप्रिया लाईफ सायन्स लिमिटेड तर्फे या कार्यासाठी देणग्या देण्यात आल्या.

## विवाह /वाङ्निश्चय

१) निनाद प्रदीप लोटलीकर, जोगेश्वरी व प्रज्ञा राजीव बोरकर, माहीम यांचा वाङ्.निश्चय संपन्न झाला.

**चुकीची दुरुस्ती**

मागील मुखपत्रिकेच्या अंकातील उल्लेखनीय देणग्या ह्या सदरात नंबर १ च्या देणगीमध्ये '' पुत्र श्री. महेश व कन्या सौ. निशा केदार पालेकर यांनी आई, वडिलांच्या स्मरणार्थ संघाला ५ लाख रुपयांची देणगी दिली आहे 'असे वृत्त देण्यात आले होते. त्यात पुत्र 'श्री मोहन' असे खरे नाव असून चुकीने 'श्री महेश' असे लिहिण्यात आले. या चुकीबद्दल अत्यंत दिलगीर आहोत. तरी वरील वृत्त 'पुत्र श्री. मोहन व कन्या सौ. निशा केदार पालेकर यांनी आईवडिलांच्या स्मरणार्थ संघाला ५ लाख रुपयांची देणगी दिली आहे.''
असे वाचावे.

**SHREE HOMOEPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**

**Genuine Indian & Imported Homoepathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Mob. : 83560 24542 / 98694 83433

Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.) , Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

***

## भारतीय एड्‌सग्रस्तांची पहिली नोंद !

सुनीता सोलोमन या पूर्वाश्रमीच्या सुनीता गायतोंडे. त्यांचा जन्म १४ ऑक्टोबर १९३९ रोजी चेन्नई येथे चामड्याचा व्यापार करणाऱ्या कुटुंबात झाला. सुनीता सोलोमन या डॉक्टर आणि सूक्ष्म जीवशास्त्रज्ञ आहेत. एडस्‌चे संशोधन आणि एडस्‌च्या निर्मूलनाविषयीच्या त्यांच्या कार्यासाठी त्या प्रसिद्ध आहेत.

सुनीता या मद्रास वैद्यकीय महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी होत्या. तिथे शिकत असताना हृदयरोग शल्य चिकित्सक डॉक्टर विक्टर सोलोमन यांच्याशी त्या विवाहबद्ध झाल्या.सुनीता यांनी यूके, यूएसए आणि ऑस्ट्रेलिया या ठिकाणी विकृतिशास्त्रात विशेष प्रशिक्षण घेतले. त्यांनी सूक्ष्मजीवशास्त्रात पीएचडी पदवी संपादन केली. पुढे त्यांनी आपल्या वडिलांच्या नावे 'वाय्.आर. गायतोंडे एडस् संशोधन आणि अभ्यास केंद्र' स्थापन केले. चेन्नईच्या एडस् डॉक्टर म्हणून त्या ओळखल्या जाऊ लागल्या. भारतीय एडस् संस्थेच्या त्या अध्यक्ष होत्या. २००१ साली त्यांना एडस्‌च्या क्षेत्रात मूलभूत स्वरुपाचे काम केल्याबद्दल गौरविण्यात आले. तामिळनाडू राज्य एडस् नियंत्रण संस्थेने २००५ साली त्यांना 'जीवन गौरव' पुरस्काराने सन्मानित केले. २००६ साली अमेरिकेच्या ब्राऊन विद्यालयाने त्यांना 'डी.एम्.एस्.' पुरस्काराने सन्मानित केले. २००९ साली भारतीय विज्ञान–तंत्रज्ञान मंत्रालयाने त्यांना 'महिला जीवशास्त्रज्ञ' पारितोषिक देऊन सन्मानित केले. २०१० साली नॅशनल अकादमी ऑफ मेडीकल सायन्सेसचे सदस्यत्व त्यांना बहाल करण्यात आले.

आम्ही कारवारकर जी.एस्.बी. बांधव त्यांच्या कर्तृत्वापुढे नतमस्तक आहोत.

संकलन - डी एन्. नाडकर्णी

***

## हवेचा निर्देशांक

संपूर्ण भारतात उत्तम हवेचा निर्देशांक : कारवार शहर भारतातील पहिल्या ६ शहरांमध्ये गणले गेले आहे.

२१ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी ४ वाजता भारतामधील २७१ शहरांमध्ये हवेच्या गुणवत्तेच्या निर्देशांका विषयी एक बुलेटीन प्रकाशित करण्यात आले त्यातील क्रमांकानुसार

| | |
|---|---|
| शिलाँग – १७ | यादगीर (कर्नाटक) – २४ |
| मडीकेरी (कर्नाटक) – २५ | तिरुमला (आंध्रप्रदेश) – २५ |
| दावणगिरी (कर्नाटक) – २९ | कारवार (कर्नाटक) – ३० |

असा गुणवत्ता निर्देशांक काढण्यात आला. कारवार शहर हे संपूर्ण भारतातील सहाव्या क्रमांकाचे उत्तम हवेचे ठिकाण नोंदले गेले. याबद्दल आम्हा कारवारकरांना अतिशय अभिमान वाटत आहे. त्याच वेळी मुंबई शहराची हवामान गुणवत्ता २११ इतकी होती!

## EX CHAIRMAN - NKGSB BANK

In the loving memory of

**Late Shri Sharadchandra Shantaram Gaitonde**



Cherishing and honoring our beloved father, Adv Sharadchandra S. Gaitonde, who left for the heavenly abode on 19th November 2025, we pray for his eternal peace.

## स्नेह पूर्ण श्रद्धांजली



**श्रीमती कमल (अंबुताई) मोहन कसबेकर**

**(जन्म: २७–११–१९२४ मृत्यु : २४–३–२०२२)**

तू आम्हांला सोडून जाऊन ३ वर्ष होतील,
परंतु तुझी आठवण आजही क्षणोक्षणी येते.
गेल्या २७ नोव्हेंबर २०२४ ला तुझी शंभरी साजरी झाली असती !
तुझ्याच सदैव आठवणीत !

*मुलगे : प्रसाद (पंकज) व नवनीत*
*मुलगी : संध्या सोहोनी, तसेच सुना व नातवंडे*

आपल्या मुखपत्रिकेचे मुद्रक व प्रकाशक भूषण देशपांडे यांच्या मातोश्रींना वयाच्या ९१ व्या वर्षी गुरुवार, दिनांक ९ ऑक्टोबर रोजी देवाज्ञा झाली. परमेश्वर त्यांच्या आत्म्याला शांति देवो! ॐ शांति!

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या
# (मागील अंकानंतर )
# उल्लेखनीय देणग्या

### १. कै. श्रीकांत वाघ यांच्या स्मृतीप्रित्यर्थ एज्युकेशन सोसायटीला आणखी सव्वा लाख रुपयांची देणगी

सँडोस या औषध निर्मितीच्या उद्योगसमुहातून उच्च पदावरून निवृत्त झालेले पारले येथे राहणारे श्री. श्रीकांत दत्तात्रय वाघ यांचे तीन वर्षांपूर्वी निधन झाले. त्यांच्या पहिल्या व दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे सुपुत्र श्री. अमीत वाघ यांनी एज्युकेशन सोसायटीला देणग्या दिल्या होत्या. श्री. श्रीकांत वाघ यांच्या तृतीय पुण्यतिथी प्रसंगीसुद्धा श्री. अमीत वाघ यांनी एज्युकेशन सोसायटीला सव्वा लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### २. श्री. मोहन शांताराम वागळे यांच्या पुण्य स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला एक लाख व एक हजार रुपयांची देणगी

अंधेरी येथे राहणारे श्री. मोहन शांताराम वागळे यांचे गेल्या सप्टेंबर महिन्यात शंभरी ओलांडल्यानंतर दुःखद निधन झाले. त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे अमेरिकेतील बंधू डॉ. सुधाकर शांताराम वागळे व सुपुत्र श्री. धीरेन यांनी एज्युकेशन सोसायटीला एक लाख व एक हजार रुपयांची देणगी दिली आहे. धीरेनची आई निवर्तल्यावरही धीरेन यांनी २०१९ साली संघास ५०,००१ रुपयांची देणगी दिली होती.

### ३. श्रीमती देवयानी दत्तात्रय (चंद्रकांत) भेंडे यांच्यातर्फे चार लाख चौपन्न हजार रुपयांची देणगी

कारवारच्या हिंदु हायस्कूलचे लोकप्रिय माजी मुख्याध्यापक कै. शांताराम दत्तात्रय भेंडे यांचे सुपुत्र श्री. दत्तात्रय(चंद्रकांत) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत. त्यांना आपल्या संघाबद्दल फार आपुलकी आहे. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती देवयानी, माहेरच्या देवयानी माधव शानभाग, हुबळी यांनी अलीकडेच चार लाख चौपन्न हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्यांतील दोन लाख चौपन्न हजार रुपये आई वडील श्रीमती इंदूमती व श्री. माधव शानभाग यांच्या स्मरणार्थ आहेत, एक लाख रुपये वडिलांकडील आजी आजोबा यांच्या स्मरणार्थ वृद्ध सेवा निधीसाठी आहेत व उर्वरीत एक लाख रुपये आईचे आई वडील श्रीमती लक्ष्मीबाई व श्री. तिमप्पा नायक (होसाड) यांच्या स्मरणार्थ वैद्यकीय निधीसाठी आहेत.

### ४. श्रीमती दुर्गा (कुसुम) व श्री. शेषगिरी सर्वोत्तम सोहोनी यांच्या स्मरणार्थ समाज सेवा निधीसाठी एक लाख रुपयांची देणगी.

पूर्वी माहीम येथे राहणारे श्री. शेषगिरी सर्वोत्तम सोहोनी हे कारवारच्या हिंदू हायस्कूलच्या १९३४ सालच्या मॅट्रीक परीक्षेतील पहिल्या तुकडीत सर्वप्रथम येणारे विद्यार्थी होते. त्यांच्या पत्नी दुर्गा (कुसुम) या रा. ब. गणपतराव तेलंग यांच्या कन्या. त्यांना कारवारकरांच्या सर्वांच्या नातीगोतींची इत्यंभूत माहिती असे. उभयतांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती अंजली दिलीप नाईक व नात श्रीमती नेहा आनंद दळवी यांनी त्याचप्रमाणे श्री. दिलीप रामचंद्र नाईक यांच्या स्मरणार्थ संघाच्या समाज सेवा निधीसाठी एक लाख रुपयांची देणगी दिली आहे.

### ५. श्री. मधुसूदन मुझुमदार तर्फे वृद्ध सेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी

वांद्रे येथे राहणारे श्री. मधुसूदन शंकर मुझुमदार यांच्या पत्नी श्रीमती शामल यांचे गेल्या महिन्यात दुःखद निधन झाले. श्री. मुझुमदार यांनी पत्नीच्या स्मरणार्थ वृद्धसेवा निधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

### ६. डॉ. नरेंद्र यार्दी यांजकडून एज्युकेशन सोसायटीला आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

बडोदा येथील एक उद्योजक डॉ. नरेंद्र रामतीर्थ यार्दी, प्रतिवर्षी सातत्याने एज्युकेशन सोसायटीला पन्नास हजार रुपयांच्या देणग्या देतात. यंदाही त्यांनी आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**७. श्री. गोविंद मुंडवाडकर यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला एक लाख पाचशे एक रुपयांची देणगी**

डोंबिवली येते राहणारे श्री. गोविंद मुंडवाडकर यांनी विद्यार्थी दशेत एज्युकेशन सोसायटीकडून आर्थिक सहाय्य घेतले होते. त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाप्रसंगी त्यांचे आईवडील श्रीमती अंबाबाई व श्री. गुंडोपंत दत्तात्रय मुंडवाडकर यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला कृतज्ञतापूर्वक १००५०१ रुपयांची देणगी दिली आहे.

## संघास मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती जयश्री सतीश कसबेकर यांच्या स्मरणार्थ जाऊ श्रीमती उषा मोहन कसबेकर यांजकडून | १०,००० |
| २. | श्रीमती मोहना व डॉ. श्री. दिगंबर भालचंद्र देसाई यांच्या स्मरणार्थ कन्या डॉ. श्रीमती पल्लवी शशांक तेलंग यांजकडून | ५,००० |
| ३. | श्रीमती दुर्गा (कुसुम) व श्री. शेषगिरी सर्वोत्तम सोहोनी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती अंजली दिलीप नाईक व नात श्रीमती नेहा आनंद दळवी त्याचप्रमाणे श्री दिलीप रामचंद्र नाईक यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती अंजली व कन्या श्रीमती नेहा आनंद दळवी यांजकडून | १,००,००० |
| ४. | पितृपक्षानिमित्त पितरांच्या स्मरणार्थ अनामिकेकडून | ५,००० |
| ५. | श्रीमती मालती व श्री. दिनकर वामन वर्टी यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती रेखा मिलिंद तेलंग व मिनल सतिश भुजले यांजकडून | ५,००१ |
| ६. | श्रीमती मीरा व श्री. गोपाल सर्वोत्तम तेलंग यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र सर्वश्री मिलींद व निमिष यांजकडून | ५,००१ |
| ७. | श्री देवीदास विश्वंभर कसबेकर यांजकडून | ५,००० |
| ८. | श्री महेश वासुदेव कामत व श्री प्रदीप वासुदेव कामत यांच्या स्मरणार्थ कामत कुटुंबीयांकडून | २५,००० |
| ९. | श्री राजेंद्र कृष्णा गावस्कर व श्रीमती शरयू कृष्णा गावस्कर यांच्या स्मरणार्थ त्यांच्या नातेवाईकांकडून | २५,००० |
| १०. | श्रीमती सिंधू सच्चिदानंद नाडकर्णी यांच्या १४ व्या पुण्यतिथी प्रसंगी नाती सुदिप्ता व अनुष्का यांजकडून | ५,००० |

## वैद्यकीय निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती देवयानी दत्तात्रय (चंद्रकांत) भेंडे यांच्यातर्फे त्यांच्या आईकडील आजोबा कै. श्री. तिमप्पा नायक व आजी कै. श्रीमती लक्ष्मी नायक (होसाड) यांच्या स्मरणार्थ संघाच्या वैद्यकीय सेवेसाठी देण्यात आलेली रक्कम | १,००,००० |

## वृद्ध सेवा निधीसाठी

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीमती शामल मधुसुदन मुजुमदार यांच्या स्मरणार्थ पती श्री. मधुसुदन शंकर मुजुमदार यांजकडून | ५०,००० |
| २. | काका श्री. सुरेश दुर्गाप्पा नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ श्रीमती आरती ब श्री. अरुण विठ्ठल नाडकर्णी यांजकडून | १०,००० |
| ३. | श्री मारुति विश्वनाथ दळवी यांजकडून | ११,००० |
| ४. | श्रीमती शांता (माई) व श्री मंगेश (भाऊ) महेश्वर नेत्रावळी यांच्या विवाहाच्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती शुभदा रमेश वागळे यांजकडून | १९,००० |
| ५. | श्रीमती देवयानी दत्तात्रय (चंद्रकांत) भेंडे (अमेरीका) यांच्यातर्फे त्यांच्या वडिलांकडील आजोबा कै. श्री. राया शानभाग व आजी कै. श्रीमती लक्ष्मी शानभाग (कुमठा) यांच्या स्मरणार्थ संघाच्या वृद्ध सेवेसाठी देण्यात आलेली रक्कम रुपये | १,००,००० |
| ६. | श्रीमती सविता मंगेश मुजूमदार यांच्या ५ व्या वर्षिक श्राध्दा प्रित्यर्थ त्यांचे पुत्र श्री. विनायक यांच्यातर्फे | १०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १. | पितृपक्षानिमित्त पितरांच्या स्मरणार्थ श्री. मनोज गोविंद भांडारकर व कुटुंबियांतर्फे | २,५०१ |
| २. | श्रीमती जयश्री सतीश कसबेकर यांच्या स्मरणार्थ जाऊ श्रीमती उषा मोहन कसबेकर यांजकडून | ५,००० |
| ३. | श्री. दीपक जगन्नाथ गायतोंडे(रिटायर्ड जॉईंट चीफ फायर ऑफिसर, मुंबई फायर ब्रिगेड) यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ पुत्र श्री. ओंकार यांजकडून | ५,००१ |
| ४. | श्रीमती अंबाबाई व श्री. गुंडोपंत दत्तात्रय मुंडवाडकर यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. गोविंद यांनी आपल्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त | १,००,५०१ |
| ५. | श्री. श्रीकांत दत्तात्रय वाघ यांच्या स्मरणार्थ पुत्र श्री. अमित यांजकडून | १,२५,००० |
| ६. | श्री. महारुद्र नारायण कुलकर्णी यांजकडून | १५,००० |
| ७. | श्री. मोहन शांताराम वागळे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त सर्वश्री धीरेन मोहन वागळे व डॉ. सुधाकर शांताराम वागळे यांजकडून | १,०१,००० |
| ८. | श्री. नरेंद्र रामतीर्थ यार्दी यांजकडून | ५०,००० |
| ९. | श्री. सुभाष शंकर पालेकर यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती सीमा यांजकडून | १०,००० |
| १०. | आई वडील श्रीमती इंदूमती व श्री. माधव शानभाग यांच्या स्मरणार्थ श्रीमती देवयानी दत्तात्रय (चंद्रकांत) भेंडे यांच्यातर्फे | २,५४,००० |

## ।। कालाय तस्मै: नम: ।।

| | नाव | गाव | सध्याचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती शांता (लीला) भालचंद्र ब्रह्मे | सदाशिवगड | मालाड |
| २. | श्रीमती शरदिनी उमेश भुजले ( पूर्वाश्रमीची पिकळे) | अंकोला | अंकोला |
| ३. | श्रीमती सुमन ध्रूवकांत देसाई | कडवाड | भांडुप |
| ४. | श्री. मोहन विश्वनाथ दिवेकर | कणसगिरी | पुणे |
| ५. | श्री. शरदचंद्र शांताराम गायतोंडे | कोणकोण | माहीम |
| ६. | श्रीमती प्रेमा रमेश कुलकर्णी | कडवाड | दादर |
| ७. | श्रीमती उमा (कुसुम) सदानंद नाडकर्णी | मिरजान | अंधेरी |
| ८. | श्री. निशिकांत लजपत नाडकर्णी | सांवर पै | अंधेरी |
| ९. | श्री. नारायण (माधव) महाबळेश्वर पालेकर | कडवाड | ओशिवारा |
| १०. | श्री. दीपक गुरुदास फेणे | चेंडिये | पुणे |
| ११. | श्री. ऊज्जैनी विश्वेंश्वर सुखटणकर | सदाशिवगड | सदाशिवगड |
| १२. | श्री. नारायण (बाळ) श्रीपाद शेटगिरी | अंकोला | फोंडा |
| १३. | श्री. सुधीर नीळकंठ स्थळेकर | अंकोला | दादर |
| १४. | श्रीमती सुधा दुर्गादास तेलग | नंदव्हाळ | पारले |
| १५. | श्री. प्रदीप जिवबा वाघ | सदाशिवगड | अंधेरी |
| १६. | श्री. मंगेश (सुनील) पद्मनाभ वाघ | हारवाडा | दादर |
| १७. | श्रीमती उषा शिवराम वागळे | माजाळी | पारले |
| १८. | श्री. रामचंद्र शांतप्पा वर्टी | सदाशिवगड | बोरीवली |
| १९. | श्रीमती शांता वासुदेव कामत (पूर्वाश्रमीची कुसुम पिकळे) | अंकोला | बोरीवली |
| २०. | श्रीमती नीता (शांता) वासुदेव (सुभाष) वागळे | बाड | अंधेरी |
| २१. | लैला रामदास भटकळ (पूर्वाश्रमीची लैला शिवानंद पालेकर) | कडवाड | गिरगांव |

आज पर्यंत संघाकडून जी मदत समाजसेवा / वृद्धसेवा / वैद्यकीय सेवा म्हणून दिली जात आहे व पुढे ही दिली जात राहील ती तुम्ही ज्ञातिबांधवांनीच दिलेल्या देणग्यांवर बँकांकडून मिळालेल्या व्याजातूनच दिली जात आहे व पुढे ही दिली जात राहील. पण ह्या देणग्यांमध्ये वाढ होणे आवश्यक आहे जेणेकरून जास्तीत जास्त गरजूंना मदत देता येईल व त्यासाठी जास्तीत जास्त बांधवांकडून देणग्या याव्यात अशी अपेक्षा आहे. धन्यवाद.

–एन् के जी एस् बी संघ.

Regd. with register of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक प्र. मो. कसबेकर यांनी दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.